GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI
Head Office : 305, Government Polytechnic Building, Kherwadi, Ali Yawar Jung Marg, Bandra (E) Mumbai - 400 051.
Regional Office : CET Cell, (DMER) Opp. Govt. Dental College, St. Georges Hospital Campus, Fort, Mumbai 400 001.
: CET Cell, Directorate of Technical Education, 3, MahapalikaMarg, Mumbai 400 001.
E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org

No.State CET Cell/NEET-PG /NEET-MDS/2017/Notice No.12/ 289/2017 Date : 28/04/2017.

# NOTICE

## NEET PG-2017/ NEET-MDS 2017

Ref: Government Resolution MED&D No.3517/C.R.164/17/Edu-2, Dated 27/04/2017

As per notice no.11 dated 26/04/2017 the publication of first selection list for admission to Postgraduate Medical/ Dental course at Government/ Private Unaided/ Deemed University college for the academic year 2017-18 was postponed till further notice.

The Government of Maharashtra has issued Government Resolution MED&D No.3517/C.R.164/17/Edu-2, Dated 27/04/2017 in respect of change in eligibility criteria for admission to Government/ Corporation/ Private unaided & Deemed University Medical/ Dental colleges in all quotas i.e. State quota/ Institutional quota/ NRI quota.

According to changed eligibility criteria, the following types of candidates will be eligible for admission in different quotas.

Types of Candidature -

| | |
|---|---|
| I. | Maharashtra Candidate.<br>a) Who have passed MBBS/ BDS course from College situated in the State of Maharashtra and are Domicile of Maharashtra.<br>b) Who is domicile of Maharashtra and admitted for MBBS/ BDS course under all India 15% quota outside the State of Maharashtra. |
| II. | Candidates who have passed MBBS/ BDS course from college situated in the State of Maharashtra but Not a domicile of Maharashtra. |
| III. | Candidates who have passed MBBS/ BDS course from College situated out side the State of Maharashtra. |
| IV. | NRI candidates eligible as per PG NEET 2017 / PG MDS 2017 merit list. |

**Following is the distribution of types of candidate(s) eligible to various Govt./Corp., Private Unaided and Deemed University Institutions**

| Sr. No. | Type of Institution | Candidate type eligible for 50% State Quota | Candidate type eligible for 35% Institutional Quota | | Candidate type eligible for 15% NRI Quota |
|---|---|---|---|---|---|
| | | | 17.5% A | 17.5% B | |
| 1. | Government/ Corporation | I | - | - | - |
| 2. | Private Unaided | I | I | I, II, III | IV; If type IV not available then I, II, III |
| 3. | Deemed University | I | I | I, II, III | IV; If type IV not available then I, II, III |

**A**= 17.5% Institutional quota for type I candidature. **B**= All India basis candidature.

The revised schedule for admission to post graduate Medical and Dental Courses is as follows:

| Sr. No. | Activity | Schedule |
|---|---|---|
| 1. | Publication of revised seat Distribution and other information as per G.R. dated 27/04/2017 | 29/04/2017 |
| 2. | Publication of First selection list | 30/04/2017 |
| 3. | Duration of Joining to selected Institutions | from 02/05/2017 to 07/05/2017 till 5.00 p.m. |
| 4. | Last date of submission of Status Retention form to selected college | 09/05/2017 |

The concerned candidate should note this revised schedule and visit website of DMER (www.dmer.org) for further instructions from time to time.

Sd/-
(Chandrashekhar V. Oak) IAS
Commissioner & Competent Authority,
State CET Cell, Maharashtra State,
Mumbai

राज्यातील शासकीय/ महापालिका/ शासन अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित/ अभिमत महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्यातील अधिवासी उमेदवारांकरीता जागा राखीव ठेवण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**गो.ते. रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,**
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.**
**शासन निर्णय क्रमांक:-सीईटी ३५१७/प्र.क्र.१६४/१७/शिक्षण-२.**
**दिनांक : २७ एप्रिल, २०१७.**

**संदर्भ** : १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन अधिसूचना क्र. सीईटी १२१५/ प्र.क्र.४१२/ १५/ शिक्षण-२, दि.१९/०१/२०१७ द्वारे अधिसूचित पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. सीईटी ३५१६/ प्र.क्र.४७८/ १६/ शिक्षण-२, दि.२०/०१/२०१७.

३) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची अधिसूचना क्र.MCI-१०८(१)/ २०१६-Med./ १७६२९०, दि.१०/०३/२०१७

४) केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F. No. V. ११०११/१/२०१५-MEP (Pt.), दि.१०/०३/२०१७.

५) केंद्रीय आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.V.११०२५/ ०४/ २०१६ - MEP, दि.०६/०४/२०१७.

६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे प्रत्र क्र.संवैशिवसं/ नीट-पीजी-२०१७/ अभिमत/ डोमेसाईल/ २०१७/२-अ, दि.२५/०४/२०१७.

७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचे प्रत्र क्र.संवैशिवसं/ अधिवास प्रमाणपत्र/ साप्रप्र/ २०१७/१-अ, दि.२६/०४/२०१७.

**प्रस्तावना** :- भारतातील विविध राज्यामधील खाजगी /अभिमत विद्यापीठातील संस्थामध्ये वैद्यकीय/ दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उमेदवारांना प्रवेश दताना स्थानिक उमदेवारांना प्राधान्याने प्रवेश देण्याबाबत काही राज्यामार्फत धोरण अवलंबिण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील स्थानिक उमेदवारांना इतर राज्यामध्ये प्रवेश मिळत नाही. महाराष्ट्रातील स्थानिक उमेदवारांना जास्त प्रमाणात वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश मिळाल्यास भविष्यात राज्यातील जनतेकरीता रुग्णसेवेकरीता अधिक प्रमाणात डॉक्टर्स उपलब्ध होतील. सबब, राज्यातील स्थानिक उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्यामध्येही पदव्युत्तर वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमाचे प्रवेश करताना राज्यातील अधिवासी उमेदवारांकरीता प्रवेशाच्या काही जागा राखीव ठेवण्याबाबत निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- राज्यातील स्थानिक उमेदवारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून आणि राज्यातील जनतेसाठी अधिक प्रमाणात रुग्णसेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून शासकीय/ महापालिका/ केंद्र शासन यांच्या अखत्यारितील तसेच खाजगी विनाअनुदानित व अभिमत विद्यापीठांतर्गत

महाविद्यालयातील वैद्यकीय/ दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशामध्ये राज्यातील अधिवासी उमेदवारांकरीता प्रवेशाच्या जागा राखीव ठेवण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे स्थानिक उमेदवारांना प्रवेशामध्ये प्राधान्य देण्याच्या दृष्टीकोनातून राखीव जागा ठेवण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१) अभिमत विद्यापीठामध्ये आणि खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमासाठी राज्य कोटयातील ५० टक्के जागांमधील प्रवेश देताना महाराष्ट्र राज्यातून एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झालेल्या व महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या उमेदवारांसाठी सदर जागा राखीव ठेवण्यात याव्या.

२) अभिमत विद्यापीठामध्ये आणि खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमासाठी संस्थांपातळीवरील ३५ टक्के जागांपैकी ५० टक्के (एकूण जागांच्या १७.५ टक्के) जागा हया महाराष्ट्र राज्यातून एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झालेल्या व महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात याव्या.

३) अभिमत विद्यापीठामध्ये आणि खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील पदव्युत्तर वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमासाठी १५ टक्के अनिवासी भारतीय कोटा (NRI Quota) हा अखिल भारतीय गुणवत्तेनुसार भरण्यात यावा.

४) खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयाप्रमाणेच अभिमत विद्यापीठामध्ये देखील पदव्युत्तर वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता SC/ ST/ VJ/ NT-१/ NT-२/ NT-३/ OBC इत्यादी संवर्गासाठी संविधानीक आरक्षण ठेवण्यात यावे.

५) शासकीय/ महापालिका/ केंद्र शासन यांच्या अखत्यारितील महाविद्यालयातील वैद्यकीय/ दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे राज्य कोटयातील प्रवेश करताना महाराष्ट्र राज्यातून एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झालेल्या व महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या उमेदवारांनाच प्रवेश देण्यात यावा.

३. वरीलप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून प्रवेशप्रक्रिया राबविण्याची जबाबदारी ही आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( अंजली वि.अंभिरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

- मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
- मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन मुंबई.
- मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
- मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
- मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा, विधान भवन, मुंबई.
- मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

- मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई.
- मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई.
- मा. प्रधानसचिव, माहिती व जनसंपर्क सचांलनालय, मंत्रालय,मंबई.
- आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
- सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्रधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.
- कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
- संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
- अधिष्ठाता/ प्राचार्य, राज्यातील सर्व शासकीय/ अनुदानित/ खासगी विनाअनुदानित/ अभिमत वैद्यकीय व दंत महाविद्यालये.
- अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट ॲण्ड डेंटल, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.
- सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती (शिक्षण-२).